" जीवनाच्या प्रत्येक वळणावर,

कष्टाला आणि दुःखाला,

सामोरे जात असताना देखील,

संपूर्ण कुटुंबात ' ज्ञानज्योत ' अखंड,

तेवत ठेवणाऱ्या कै.दादा व कै.अण्णा,

या महान विभूतीस ... "



# ऋणनिर्देश

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल.( मराठी ) पदवी परीक्षेसाठी ' सुमेध वडावाला (रिसबूड ) यांच्या ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीचा अभ्यास या विषयावरील लघुप्रबंध सादर करताना मला आनंद होत आहे. या निमित्ताने संशोधनाच्या प्रवासाविषयी, संशोधनाच्या कामी ज्यांचे सहकार्य व प्रेरणा लाभल्या त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो.

' मराठी ' हा विषय माझ्या लहानपणापासूनच आवडीचा राहिला आहे. त्यामुळे महाविदयालयीन जीवनात ललीत साहित्य वाचनाकडे मी आपोआपच वळलो. या वाचनात ग्रामीण, दलित, नागरी अशा विविध विषयांवरील कादंबरीतून वास्तव जीवन कळत गेले. आपण जगत असलेले जीवन हे साहित्यातून सहजपणे दिसू लागले. त्यात विशेष म्हणजे महानगरीय जीवन हे आपल्या ग्रामीण जीवनापेक्षा किती भयाण आहे. याचे कोडे मला सतत पडत होते. आणि म्हणून महानगरीय विषयावरील कादंबरीचा अभ्यास करण्याची आवड माझ्या मनात निर्माण झाली. म्हणून शिवाजी विदयापीठामध्ये जेव्हा संशोधनासाठी विषय निवडण्याची संधी मिळाली. तेव्हा या कादंबरीचा अभ्यास करण्याचे निश्चित केले.

या संशोधनाच्या कार्यासाठी डॉ.वि.दा.वासमकर सरांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. याशिवाय त्यांनी वाङ्मयीन लेखनाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. यामुळे मी ' सुमेध वडावाला ' यांच्या कादंबरीचा अभ्यास करू शकलो. या संशोधनात सरांचा मोलाचा वाटा आहे. या स्नेहपूर्ण मार्गदर्शनामुळे डॉ.वि.दा.वासमकर सर आणि त्यांचे कुटुंबीय यांचे ऋण शब्दात व्यक्त न करता मी त्यांच्या पूर्ण ऋणात राहू इच्छितो.

तसेच आदरणीय सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांनी मला संशोधन कार्यासाठी मदत केली. त्यांच्याशी झालेली चर्चा या कामात उपयोगी पडली. म्हणून त्यांच्या ऋणातून मी मुक्त होऊ इच्छित नाही.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

शिवाजी विदयापीठातील मराठी विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ.रवींद्र ठाकूर, डॉ.कृष्णा किरवले, डॉ.रणधीर शिंदे आणि प्रा. हिमांशु स्मार्त यांनी शंका समाधान करून अनमोल मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणा व प्रोत्साहन माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. याशिवाय मराठी विभागातील सर्व कर्मचारी वर्गाने या कामात सहकार्य केले म्हणून त्यांचे देखील आभार !

शिवाजी विद्यापीठ येथील डॉ. बाबासाहेब खर्डेकर ग्रंथालय, पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातील ग्रंथालय, महाराष्ट्र साहित्य परिषद ( पुणे शाखा ), पुणे मराठी ग्रंथालय, तसेच सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयाचे ग्रंथालय आणि चिंतामणराव व्यापार महाविद्यालयाचे ग्रंथालय इत्यादी सर्व ग्रंथालयातील ग्रंथपाल व कर्मचारीवृंद यांनी संशोधनसामग्री, आवश्यक पुस्तके वेळोवेळी आनंदाने उपलब्ध करून दिली म्हणून त्यांचे ही आभार !

सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांचे मित्र श्री. दिनेश परब आणि डिंपल पब्लिकेशनचे मालक श्री. काळे यांनी आवश्यक पुस्तके उपलब्ध करून दिली म्हणून त्यांचेदेखील याठिकाणी आभार मानतो.

धुळे जिल्हयातील मालपूर हे माझे एक खेडेगाव. त्या ठिकाणच्या जिल्हा परिषदेच्या शाळेपासून माझ्या शैक्षणिक जीवनाची वाटचाल सुरु झाली, आणि ती आजवर चालूच आहे. म्हणून माझ्या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील सर्व गुरुवर्य, ज्या माध्यमिक शाळेत माझे दहावी पर्यंतचे शिक्षण झाले. त्या ' स्व.वि.संस्थेच्या मालपूर हायस्कूल ' मधील सर्व गुरुजन आणि कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन अशा दोन्ही स्तराचे शिक्षण घेतले अशा ' श्रीमती पी.बी.बागल ' महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्ग यांचेदेखील या निमित्ताने आभार मानतो.

बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून मी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात एम्.ए. साठी दाखल झालो. या महाविद्यालयात मला प्रत्येक दिवस उत्साही आणि नित्यनूतन वाटत होता. तो केवळ तेथील बुध्दिवान प्राध्यापक वर्ग आणि आल्हादायक वातावरणामुळे. त्यामुळेच मी एम्.ए. पूर्ण केल्यावर एम्. फिल. करण्याचे ठरविले. म्हणून या सर्वांचे आभार !

कै. आण्णा ( वडील ) आणि कै. दादा ( काका ) यांच्या अथक परिश्रमातून मला वेळोवेळी मदत आणि प्रेरणा मिळाली. त्याचबरोबर माझी आई व काकू यांच्या मायेमुळे आणि माझे सर्व भाऊ आणि वहिनी यांचे मार्गदर्शन आणि आर्थिक मदतीचा झरा जो आजही चालूच आहे, तसेच या सर्वांचे आशीर्वाद माझ्या पाठीशी सतत असल्याने या संशोधनाच्या कामात मला अधिक कष्ट सोसावे लागले नाहीत, म्हणून या निमित्ताने त्यांचेही आभार मानतो.

माझ्या शैक्षणिक जीवनात अनेक मित्रांचे सहवास लाभले. त्यांना माझ्या आयुष्यात आगळे - वेगळे स्थान आहे. प्रत्येकाची विशेष जागा आहे. म्हणून मी त्यांचा ऋणी आहे. त्याशिवाय एम.फिल.च्या कामात ज्या मित्रांचे विशेष सहकार्य लाभले. त्यात सचिन आवताडे, संतोष सणस,संतोष काळे, समीर कोळी, विजय बेदरे, सचिन धायगुडे, पद्माकर वानखडे, संतोष बोंगाळे, गजानन अपिने, सुहास कद्रे, देशिंगे, अनिरुध्द काळे या सर्व संशोधक मित्रांचे विशेष आभार !

प्रा.सौ.विजया बापट यांनी आपुलकीने मुद्रितशोधनात मदत केली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सौ.माधुरी मानकर, सांगली यांनी या प्रबंधाच्या टंकलेखनासाठी घेतलेल्या परिश्रमामुळे या लघुप्रबंधाचे काम वेळेत पूर्ण होऊ शकले, याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक कृतज्ञ आहे.

या सर्वांच्या सहकार्यामुळे व प्रेमामुळेच हा लघुप्रबंध पूर्ण होऊ शकला. या सर्वांसाठी मी अत्यंत कृतज्ञ आहे. पुन्हा एकदा या सर्वांच्या सहकार्याबद्दल अंतःकरणापासून आभार !

( योगेश्वर चव्हाण )